नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/11/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## पोस्टे कुही हद्दीतील वडद पारधी बेडा

## येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने आज दि. २१/११/२०२३ रोजी वडद पारधी बेडा येथे मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण ०१ महिला व ०३ पुरूष **आरोपी नामे—१) रविन्द्र मोरेश्वर पवार वय ३४ वर्ष, २) रूषी राजु माळी वय ३२ वर्ष ३) जितेश रसवंत पवार वय ३२ वर्ष** हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातून एकुण मोहाफुल रसायण सडवा ३६०० लीटर सडवा रसायन २०/—रू लीटर प्रमाणे ७२०००/—रू चा माल तसेच लहान मोठे ड्रम व इतर साहित्य किंमती ९५००/रू व ३५ नग देशी दारू भरलेल्या निपा प्रत्येकी १८० एम एल च्या प्रति निप ७०/—रू प्रमाणे २४५०/रू एकुण किंमती ८३९५०/रू चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. ०१ महिला व ०३ पुरूष आरोपी विरुद्ध पो.स्टे कुही येथे कलम ६५ (ई), (फ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे..

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोलीस निरीक्षक महेश भोरटेकर ठाणेदार पोस्टे कुही, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, संजय बान्ते, अरविंद भगत, रोशन काळे, राजु रेवतकर, प्रमोद वानखेडे ,नितेश पोशि. निलेश इंगुलकर ,मपोशि वनिता शेन्डे, कविता बचले, पो.स्टे. कुही पोलीस स्टॉफ सफौ संजय कुलकर्णी ,पोहवा चांगदेव कुथे, पोशि दुर्गश डहाके, मपोशि दुर्गा शंभरकर, दिक्षा गोंडाणे यांनी संयुक्तरीत्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर